वर्ष-०९ | अंक-२७ | मुंबई, मंगळवार २३ ते २९ मे - २०२३ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 पोहणे आणि आरोग्य

3 → सुशासन नियमावली ठीक, पण महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम- 2015चे वास्तव काय?

मुंबईकरांनो सावधान! घरफोड्या करणा-या मोलकरीण गँगचा पोलिसांकडून पर्दाफाश, महिलांची टोळी गजाआड ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

## मोबाईल, दागिन्यांनंतर पुण्यात आता चक्क चप्पल चोरी; खडकीमध्ये तब्बल 55 चप्पल आणि बूट जोड चोरीला



पुण्यातील खडकी भागातील एका दुकानातून तब्बल 55 चप्पल आणि बूट जोड चोरट्यांनी चोरुन नेले. तीन जणांनी मिळून 30 ते 40 हजार रुपयांचे 55 चप्पलांचे जोड लंपास केले. यातील 40 मेन्स शूज तर 15 लेडीज चपला चोरट्यांनी चोरल्या. हरेश आहुजा यांनी या प्रकरणात पोलिसात तक्रार दिली होती. या चोरीचा तपास करताना पोलिसांनी सागर चांदणे, आकाश कपूर, अरबाज ...पान २ वर...

# भिवंडीत सात अट्टल गुहेगारांकडून 23 गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश; लाखोंचा मुद्देमाल हस्तगत

भिवंडी पोलिसांनी दमदार कामगिरी करत सात अट्टल गुन्हेगारांना बेड्या ठोकून त्यांनी केलेल्या 23 गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळाले आहे . या अटक केलेल्या गुन्हेगारांकडून लाखोंचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे .



भिवंडी पोलिसांनी दमदार कामगिरी करत सात अट्टल गुन्हेगारांना बेड्या ठोकून त्यांनी केलेल्या 23 गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळाले आहे. या अटक केलेल्या गुन्हेगारांकडून लाखोंचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे. याच गुन्हेगारांकडून आणखी काही गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता भिवंडीचे पोलीस उपआयुक्त नवनाथ ढवळे यांनी व्यक्त केली आहे. पोलीस पथक त्या दिशेने तपास करत असल्याचे आज शांतीनगर पोलीस ठाण्यात झालेल्या पत्रकार परिषेदत माहिती देताना प्रसारमाध्यामांना सांगितलं.

भिवंडी शहरात वाहन चोरीच्या गुन्ह्यासह मोबाईल आणि घरफोडीच्या गुन्ह्यात वाढ झाल्याने पोलीस उपआयुक्त ढवळे यांनी हद्दीतील सर्व च पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना या गुन्ह्याला आळा घालण्याचे सक्त आदेश दिले होते. त्यानुसार शांतीनगर पोलिसांच्या पथकाने शिताफीने शोध घेऊन वाहने चोरी करणाऱ्या त्रिकुटाला बेड्या ठोकल्या आहेत. बिलाल रिजवान अन्सारी (वय 27 वर्षे, रा. मालेगाव) ...पान २ वर...

## पादत्राणांचे ५५ जोड चोरणारे गजाआड



पुणे : खडकी भागात एका पादत्राण विक्रेत्याच्या गोदामातून चोरट्यांनी पादत्राणांचे ५५ जोड लांबविल्याचा प्रकार सोमवारी उघडकीस आला. या प्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली. सागर विलास चांदणे ( वय ३४), आकाश रमेश कपूर (वय ३३), अरबाज महंमद शेख (वय ३५, तिघे रा. खडकी ) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत हरेश आहुजा (रा. खडकी) यांनी खडकी पोलीस ठाण्यात फिर्या द दिली आहे. आहुजा यांचे खडकी बाजार परिसरात पादत्राणांचे दुकान आहे. आहुजा यांचे गोदाम या परिसरात आहे. चांदणे, ...पान २ वर...

## सोन्याच्या तस्करी प्रकरणी 6 परदेशी नागरिकांना अटक, मुंबई विमानतळावर कस्टम्स विभागाची कारवाई

मुंबई : मुंबई विमानतळावर कस्टम्स विभागाने सोन्याची तस्करी केल्याप्रकरणी 6 परदेशी नागरिकांना अटक केली आहे. कस्टम विभागाने या नागरिकांकडून सुमारे 1. 98 कोटी रुपये किमतीच्या 3.7 किलोग्राम सोन्याची पावडर जप्त केली आहे. एजन्सीच्या सूत्रांनी सांगितले की, या



प्रवाशांनी शरीरात सोने लपवून ठेवले होते.अशा प्रकारे सापडले सोने : कस्टम अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आंतरराष्ट्रीय विमानतळावर आल्यानंतर त्यांच्या प्रोफाइलिंगच्या आधारे त्यांच्या शरीरात काही वस्तू असल्याचे समजले. त्यांच्या ...पान २ वर...

## ठाण्यात ६ वर्षीय मुलीचा विनयभंग, खून प्रकरणात पोलीस अपयशी, आरोपी निर्दोष

मुंबई : सुमारे दहा वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील ठाणे शहरांमध्ये सहा वर्षा च्या एका बालीकेवर बलात्कार केला गेला. त्यानंतर तिचा खून देखील झाला होता. यासंदर्भा त पोलिसांनी गुन्हा देखील दाखल केला. कनिष्ठ न्यायालयाने त्या आरोपीला फाशीची शिक्षा सुनावली. त्यानंतर प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात गेलं. मुंबई उच्च



न्यायालयातून सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेलं. मात्र, या खटलाबाबत देशाच्या सर्वोच्च न्यायालयामध्ये या आरोपीची उचित पुराव्या अभावी सुटका झाली आहे. तसेच त्याची फाशीची शिक्षा देखील रद्द करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या खंडपीठांसमोर ...पान २ वर...

# दुचाकीस्वाराची वाहतुक पोलिसाला धडक

मुंबईः दुचाकीवरून तिघे प्रवास करत असल्यामुळे थांबण्याचा इशारा दिला असता दुचाकी चालकाने वाहतुक पोलिसालाच धडक दिल्याचा प्रकार सांताक्रुझ पूर्व येथे रविवारी रात्री घडला. या अपघातात वाहतुक पोलीस जखमी झाला असून दुचाकी चालकाविरोधात वाकोला पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार पोलीस हवालदार विजय चव्हाण(४८) वाकोला वाहतुक शाखेत कार्यरत आहेत. रविवारी रात्री ते सांताक्रुझ पूर्व येथील गेट क्रमांक ८ येथे वाहतुक नियमानासाठी तैनात होते. त्यावेळी परिसरात एका दुचाकीवर तिघेजण प्रवास करत असल्याचे




चव्हाण यांना दिसले. दूरूनच पाहिल्यानंतर चव्हाण यांनी त्यांना थांबण्याचा इशारा दिला. पण दुचाकीस्वाराने दुचाकी थांबवण्याऐवजी भरधाव वेगाने चालवण्यास सुरूवात केली. त्यानंतरही चव्हाण यांनी त्याला थांबवण्याचा इशारा दिला. पण दुचाकीस्वाराने थेट चव्हाण यांना

**या प्रकरणी सोमवारी पहाटे चव्हाण यांच्या तक्रारीवरून दुचाकी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

धडक दिली. त्यावेळी चव्हाण खाली कोसळले. त्यांना तातडीने व्हीएन देसाई रुग्णालयात नेण्यात आले. तेथे त्यांच्यावर उपचार करण्यात आले. या प्रकरणी सोमवारी पहाटे चव्हाण यांच्या तक्रारीवरून दुचाकी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाकोला पोलीस अधिक तपास करत आहेत.

## जबरी चोरी, घरफोड्या करणारी आंतरराज्य टोळी जेरबंद, 36 गुन्हे उघडकीस, आरोपींमध्ये सिव्हील इंजिनिअरचा समावेश !

कोल्हापूर शहरासह जिल्ह्यातील वाढत्या चेन स्नॅचिग आणि घरफोडीच्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर पोलिसांनी (Kolhapur) आंतरराज्य टोळीचा पदार्फा शकेला आहे. या टोळीकडून तब्बल 36 गुन्हे उघडकीस आले आहेत. टोळीकडून 35 लाख 83 हजार 300 रुपये किंमतीची मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेकडून ही कारवाई करण्यात आली. पोलिसांकडून नितेश उर्फ दिपू जगन्नाथ इफाळे (वय 37, रा. प्लॉट नं. 38 चंद्र माऊली कॉलनी, रूक्मिणीनगर, बेळगाव, ता.जि. बेळगाव), शुभम सुनिल सुर्यवंशी (वय 19, रा. आर.पी. डी. कॉलेज रोड,



दुसऱ्या गेटजवळ, बेळगाव), त्यांचे साथीदार उमेश उर्फ लिंगराज रामेगौडा (वय 35, रा. जमनटळळी, ता. सकलेशपूर, जि. हासन), कृष्णा अशोक तलवार (रा. हुबळी, ता.धारवाड जि. बेळगाव) यांच्या मुसक्या आवळण्यात आले आहेत.

कोल्हापुरातील लता पांडुरंग म्हातुगडे यांच्या गळयातील सोन्याची चेन लंपास केल्यानंतर पोलिसांकडून तपास सुरु असताना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला हा गुन्हा रेकॉर्डवरील गुन्हेगार दिपू जगन्नाथ डफाळेने व त्याच्या साथीदारांनी केल्याची माहिती मिळाली. हे ...पान २ वर...



## ३ आठवड्यांनंतर प्रसिद्ध अभिनेत्रीची तुरुंगातून सुटका

**मुंबई :** 'सडक २' आणि 'बाटला हाऊस' सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीस आलेली अभिनेत्री क्रिसन परेरा हिला दुबई येथील शाहजहा तुरुंगात कैद करण्यात आले होते. पण आता तब्बल तीन आठवड्यांनंतर अभिनेत्रीची सुटका झाली. अमली पदार्थांच्या तस्करीत अभिनेत्री परेराचे नाव आल्यामुळे तिला अटक करण्यात आली. अमली पदार्थांच्या तस्करी प्रकरणात मला अडकवण्याचा प्रयत्न करण्यात आला, असे क्रिसन परेरा हिचे म्हणणे आहे. आता अभिनेत्रीची अमली पदार्थांच्या तस्करी प्रकरणातून सुटका झाली आहे.

**महाविकास आघाडीतली मतभिन्नता आणखीन तीव्र**


## जागावाटपाच्या वेळी 'मोठा भाऊ' अडचणीचा ठरणार?

उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी आज पुन्हा लोकसभेसाठी १९ जागेचा राग आळवल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी महाविकास आघाडीत आपणच मोठे भाऊ असल्याचा दावा केल्यामुळे महाविकास आघाडीतली मतभिन्नता आणखीनच तीव्र झाली आहे. काँग्रेसच्या नेत्यांनी यावर जरी मवाळ भूमिका घेतली असली तरी प्रत्यक्ष जागावाटपाच्या वेळी महाविकास आघाडीतला मोठा भाऊ अनेकांना त्रासदायक ठरणार असल्याची ही चिन्हे आहेत, असे जाणकारांना वाटते.

दोनच दिवसांपूर्वी संजय राऊत यांनी लोकसभेच्या ४८ जागांपैकी महाविकास आघाडी सर्व जागा लढवेल आणि त्यातल्या १९ जागा तेव्हाच्या शिवसेनेच्या होत्या, तेवढ्या जागा आमच्या कायम राहतील, असा दावा केला. आज याचा पुनरुच्चार करताना पुन्हा त्यांनी ४८ पैकी १९ जागा शिवसेनेच्या असतील असे नमूद केले. यामुळे महाविकास आघाडीत निर्माण झालेला असंतोष



खदखदत असतानाच आज एका मेळाव्यात अजित पवार यांनी काँग्रेसच्या नेत्यांना सुनावले. गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेसला आम्ही मोठा भाऊ मानत आलो आहोत; परंतु मागच्या निवडणुकीत विधानसभेतले आकडे दाखवून देतात की आम्ही ५४ आहोत, तर तुम्ही ४४ आहात. त्यामुळे आता मोठे भाऊ आम्हीच आलो आहोत, हे त्यांनी लक्षात ठेवावे, असे अजित पवार म्हणाले.



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना आम्ही पूर्वीपासून कधीही मोठेपणा मिरवला नाही, असे सांगितले. अनेक वर्षे आमची सदस्यसंख्या नेहमीच जास्त राहिली. मात्र आम्ही सर्वांना आमच्या बरोबरीनेच नेले. सर्वांशी समन्वयातच संबंध ठेवले, असे ते म्हणाले.

## स्वच्छता अभियान लोकचळवळ व्हावी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन**

जी-२० परिषदेच्या पर्यावरण आणि हवामान शाश्वतता कार्यगटाच्या तिसऱ्या बैठकीला 'जी-२० समुद्र किनारा स्वच्छता' मोहिमेने सुरुवात करण्यात आली. राज्यपाल रमेश बैस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समुद्रकिनारा स्वच्छतेची शपथ देऊन स्वतः जी-२० परिषदेतील सदस्य राष्ट्रांच्या प्रतिनिधींसमवेत स्वच्छता केली. स्वच्छता अभियानामध्ये लोकचळवळीची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले.

जुहू बीच येथे आयोजित या मोहिमेत केंद्रीय पर्यावरण व वने मंत्री भुपेंद्र यादव यांनीही



भारताला जी-२० चे यजमानपद मिळणे ही अभिमानाची बाब आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. देशाची अर्थव्यवस्था ११ व्या क्रमांकावरून ५ व्या क्रमांकावर आणण्याचे मोठे काम त्यांनी केले आहे. ही गर्वाची बाब आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम करत आहोत. राज्य शासनाला केंद्र सरकारचे सहकार्य नेहमी मिळत आहे. त्यातून राज्याला विकासाकडे नेण्याचा प्रयत्न राज्य शासन करत आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

उपस्थितांना स्वच्छतेची शपथ दिली. या कार्यक्रमाला केंद्रीय पर्यावरण राज्यमंत्री अश्विनीकुमार चौबे, पर्यटन मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार अमित साटम, प्रधान सचिव प्रवीण दराडे, महापालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल आदी उपस्थित होते.

जी-२० परिषदेतील विविध देशांच्या प्रतिनिधींचे स्वागत करून मुख्यमंत्री म्हणाले, मुंबई हे गतिशील शहर असून देशाचे ग्रोथ इंजिन असलेले शहर आहे. मातृभूमी संरक्षणाचा संदेश संत ज्ञानेश्वरांनी दिला आहे. मातृभूमी ही मानवी जीवनासाठी वरदान असून आपण त्याचे रक्षणकर्ते आहोत. त्यासाठी आपल्या आयुष्यातील प्रत्येक कार्य पर्यावरणपूरक असावा, असा संदेश या स्वच्छता मोहिमेतून पोहोचावा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये स्वच्छता अभियानाला सुरुवात केली. त्यानंतर या अभियानाने जनआंदोलनाचे रूप घेतले आहे. देशातील प्रत्येक गाव, शहर स्वच्छतेच्या दिशेने पाऊल टाकत आहेत. राज्य शासनानेही पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू केले असून त्यासाठी पावले उचलली आहेत. स्वच्छता अभियानामध्ये लोकचळवळीची आवश्यकता असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

## आयुक्तांनी घेतला विभाग कार्यालयांतील कामकाजाचा आढावा

**बेलापूर विभागापासून सुरुवात**

**नवी मुंबई** नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी महानगरपालिकेशी संबंधित कामकाजाचा प्रत्यक्ष आढावा घेण्यास सुरुवात केली असून त्यांनी शनिवारी बेलापूर विभाग कार्यालयाचा प्रत्यक्ष भेट देऊन आढावा घेतला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व संजय काकडे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त नितीन नार्वेकर, शहर अभियंता संजय देसाई, उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, डॉ. अमरिश पटनिगिरे, सोमनाथ पोटरे, आदी उपस्थित होते.

## अमेरिका गोळीबाराच्या घटनेने पुन्हा एकदा हादरली

अमेरिका पुन्हा एकदा गोळीबाराच्या घटनेने हादरली. उत्तर मेक्सिकोमधील बाजा कॅलिफोर्नियामध्ये शनिवारी एका रेसिंग शो दरम्यान हा गोळीबार झाला. या गोळीबारात १० जण ठार झाले, तर ९ जण जखमी झाले आहेत.

याबाबत, सविस्तर वृत्त असे की एन्सेनाडा शहरातील सॅन व्हिसेंट भागात ऑल-टेरेन कार रेसिंग शो



सुरू होता. याचदरम्यान, एका व्हॅनमध्ये आलेल्या हल्लेखोरांनी अचानक गोळीबार सुरू केला. अंदाधुंद गोळीबार झाल्यानंतर नागरिकांची एकच धांदल उडाली. या घटनेची माहिती समजताच पोलीस प्रशासन, अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेतली. गोळीबाराच्या घटनेनंतर या भागात काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. तसेच हा परिसर अमली पदार्थांच्या तस्करीसाठी ओळखला जातो. दरम्यान, गोळीबारात जखमी झालेल्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गोळीबाराचे कारण अद्याप अस्पष्ट आहे.

पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार २३ ते २९ मे - २०२३



# स्टॅमिना वाढविण्यासाठी

**कुठल्याही खेळाडूची खरी संपत्ती म्हणजे केवळ तंदुरुस्त शरीर नसते तर त्याचे सामर्थ्य म्हणजे स्टॅमिना असतो. स्टॅमिना म्हणजे केवळ ठरावीक काळापुरती आवश्यक असणारी शक्ती अथवा ऊर्जा नव्हे, तर आजारपणात आणि तणावपूर्ण परिस्थिती विरुद्ध लढण्याचे सामर्थ्य होय. ज्यांना आपला स्टॅमिना वाढवायचा आहे त्यांनी काही टिप्स अवश्य लक्षात ठेवाव्यात.**

स्टॅमिना वाढवायचा असेल तर काही मूलभूत शारीरिक तपासण्या करून घ्याव्यात. त्यातून तुम्ही किती फिट आहात हे समजेल आणि काही दुखापत किंवा इतर तक्रारींचा सामना कशा प्रकारे करू शकता याचेही चित्र स्पष्ट होईल.

स्टॅमिना वाढविण्यासाठी केवळ शारीरिक व्यायामावर लक्ष केंद्रित करू नये, तर आपण काय आहार घेतो, काय खातो याकडेही लक्ष दिले पाहिजे. पूर्ण संतुलित आहार ज्यामध्ये कमी चरबीचे पदार्थ असतील, भरपूर फळे असतील, हिरव्या भाज्या असतील असा आहार घ्यावा. यामुळे शरीर तंदुरूस्त राहील आणि शारीरिक व मानसिक सामर्थ्य वाढेल.

स्टॅमिना वाढविण्यासाठी सर्व प्रकारचे मैदानी खेळ खेळणे उत्तम असते. यामुळे शरीराबरोबरच मनाचाही उत्साह वाढतो. फुटबॉल, बास्केटबॉल आणि सर्वप्रकारचे इतर मैदानी खेळ हृदयाची ताकद वाढविण्यासाठी उपयोगाचे ठरतात. कारण यामुळे शरीराला भरपूर ऑक्सिजनचा पुरवठा होतो.

**हळू सुरूवात करावी :** स्टॅमिना वाढविण्यासाठी दैनंदिनीत काही बदल करत असाल तर ते हळूहळू सुरू करावेत. तुम्ही जर ठरावीक अंतर ठरावीक वेळेत धावून पार करण्याचा संकल्प करत असाल तर सुरुवातीला कमी अंतर थोडे पायी चालून आणि थोडे पळून पूर्ण करण्याचा सराव करावा. म्हणजे शरीर हळूहळू तयार होईल. यानंतर टप्प्याटप्प्याने स्टॅमिना वाढत जाईल. हृदयाच्या स्नायूंची ताकद वाढेल असे काही व्यायाम करणे हा स्टॅमिना वाढविण्याचा उत्तम उपाय आहे. त्यासाठी चालणे, धावणे, पोहणे, उड्या मारणे इत्यादी पर्यायांचा वापर करावा. उत्तम परिणाम दिसण्यासाठी या व्यायामाची तीव्रता, गती हळू वाढवत न्यावी.

स्टॅमिना वाढविण्यासाठी दिवसा घेण्यात येणारी विश्रांती टाळावी. पण सुरुवातीला ताण जाणवत असेल तर काही सेकंद अथवा मिनिटे विश्रांती घ्यावी. शरीराला सतत ऊर्जेचा पुरवठा होण्यास -ाठी ठरावीक कालानंतर थोडा-थोडा पौष्टिक आहार घेत राहावा. तसेच दिवसभरात पुरेसे पाणी पितो का नाही याकडे लक्ष ठेवावे. शरीरात पाण्याचे प्रमाण कमी झाले तर रक्त घट्ट बनू शकते. त्यामुळे रक्तप्रवाह मंद होऊ शकतो आणि पेशींमध्ये ऑक्सिजनचे प्रमाण कमी होऊन त्याची कमतरता जाणवते.

शरीरातील सोडियमची पातळी संतुलित राखण्यासाठी प्रयत्न करावेत. दिवसभर भरपूर व्यायाम करत असाल आणि हवामान उष्ण असेल तर शरीरातून अधिक घाम बाहेर टाकला जातो. त्यामुळे शरीरातील मिठाचे प्रमाण अर्थात क्षारांचे प्रमाण कमी होते. त्यामुळे शरीरातील ऊर्जा कमी झाल्यासारखे जाणवते. तसेच डोके हलके पडल्यासारखे आणि गरगरल्यासारखे वाटते. हा त्रास टाळण्यासाठी शरीरात पुरेशा प्रमाणात सोडियम मिळत आहे का हे बघावे. तसेच हायपरटेंशनचा धोका आहे का हे देखील तपासावे.

स्टॅमिना वाढविण्यासाठी भरपूर कार्बोहायड्रेट्सयुक्त पदार्थ आहारात समाविष्ट करावेत. या अन्नघटकांमधून शरीराला स्टार्च आणि शुगर मिळते. त्यातून स्नायूंना ऊर्जा मिळते. परिणामी सहनशक्ती आणि ताकद वाढण्यास मदत मिळते. त्यासाठी भरपूर कार्बोहायड्रेट्स्युक्त पदार्थ म्हणजे डाळी, पोळी, फळे, भाज्या आणि दूध घ्यावे.

स्टॅमिना वाढविण्यासाठी स्वत:च्या मर्यादा ओळखाव्यात. ज्या गोष्टी आपण करू शकत नाही त्या करण्यासाठी शरीरावर बळजबरी करू नये. यामुळे मसलक्रॅम्प्स किंवा जखम होऊ शकते. तुम्ही लठ्ठ असाल तर वजन कमी करण्याबरोबरच स्टॅमिनाही योग्य राहील याचीही काळजी घेतली पाहिजे. सतत डॉक्टरांच्या किंवा ट्रेनरच्या संपर्कात राहण्याऐवजी आपत्ती टाळणे योग्य ठरणारी असते त्या आपल्या मर्यादा जाणून घ्याव्यात.

आपल्या सर्वांनाच चांगल्या किंवा वाईट सवयी असतात. त्या जाणून घ्याव्यात. वाईट सवयीची यादी करावी. धूम्रपान, अतिरिक्त मद्यपान, जंकफूडचा अधिक वापर या सारख्या सवयी समूळ घालवण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे चांगल्या सवयी फिट राहण्यासाठी आणि स्टॅमिना वाढविण्याचे प्रयत्न सुधारण्यासाठी उपयोगाच्या ठरतील. आपण करत असलेल्या व्यायामाच्या, घेत असलेल्या आहाराच्या नोंदी ठेवाव्यात. यामुळे आपल्याला सुधारणा करण्याची संधी मिळते.

कुठलाही व्यायाम सुरू करण्यासाठी सर्वप्रथम वॉर्मअप करायला विसरू नये. यामुळे शरीर व्यायाम करण्यासाठी तयार होण्यास मदत होते. वेटट्रेनिंग स्टॅमिना वाढविण्यासाठी उत्तम प्रकार आहे. सुरुवातीला कमी वजनाचे डंबेल्स उचलून सुरुवात करावी आणि नंतर वजन वाढत जाईल. शारीरिक शक्ती वाढविण्यासाठी व्यायामा बरोबर विश्रांतीही महत्त्वाची असते. त्यामुळे सर्व प्रकारच्या व्यायामानंतर एक दिवस विश्रांती घ्यावी.

उंची आणि शरीर बांध्यानुसार योग्य वजन राखणे हे देखील स्टॅमिना वाढविण्यासाठी गरजेचे असते. तुमचे वजन गरजेपेक्षा कमी असेल तर डॉक्टर किंवा आहार तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. सकाळची सुरूवात पौष्टिक न्याहारीने करावी. वाटी भरून ओटस किंवा गव्हांचे टोस्ट घ्यावेत. पौष्टिक न्याहारीतून मॅग्नेशियम, मँगेनिज, क्रोमीयम आणि कॉपर पुरेशा प्रमाणात मिळेल हे पाहावे. आहारामध्ये फ्लेक्स, माशांचे तेल यांचा समावेश करावा. तसेच चांगल्या गुणवत्तेची प्रथिने घ्यावीत. यामध्ये आवश्यक असणारी ॲमिनोॲसिड असतात. शरीराच्या अंतर्गत कार्यासाठी ती गरजेची असतात. म्हणून प्रथिने असणारा आहार म्हणजे अंड्यातील पांढरा भाग, लो फॅट मिल्क, दूध उत्पादने, मासे, चिकन यांचा आहारात समावेश करावा.



# पोहणे आणि आरोग्य

**साधारणपणे मे महिन्याच्या सुट्ट्या सुरू झाल्या की, जलतरण तलाव, विहिरी, तलाव या ठिकाणी पोहणाऱ्यांची गर्दी दिसून येते. ग्रामीण भागात तर बहुतेक मुलांना लहानपणीच विहिरीमध्ये, नदीमध्ये किंवा तलावात पोहायचे प्रशिक्षण दिले जाते. शहरांमध्येही सुट्टी सुरू झाली की, जवळच्या जलतरण तलावात मुलांना पोहण्यासाठी पाठवले जाते. केवळ लहान मुलेच नव्हे तर अनेक स्त्री-पुरुषही पोहण्याचा आनंद लुटतात. पोहण्यामध्ये मौज असली तरी तो उत्कृष्ट व्यायाम प्रकारही आहे.**

हवेच्या तुलनेत पाण्याची घनता अधिक आहे. त्यामुळे गुरुत्वाकर्षणाचा प्रभाव निष्क्रिय होतो. त्यामुळेच अन्य व्यायाम प्रकारात शरीरातील सांध्यांवर येणारा आवेग किंवा ताण पोहण्यामध्ये येत नाहीत. पाण्यात सांध्यावर दबाव पडत नाही. एवढेच नव्हे तर तीव्र झटक्यांपासूनही पाणी सुरक्षितता प्रदान करते. जलतरणाच्या सर्व प्रकारात गती नियंत्रित होते. तसेच पाण्याच्या प्रतिरोधामुळे ती कमी होते.

हृदयविकाराचा त्रास असणाऱ्या रुग्णांनाही जलतरणामुळे हृदयाच्या ठोक्यांचा वेग तसेच हृदय आणि रक्त नलिकेच्या आजारापासून असणारा धोका नियंत्रणात ठेवता येतो. पोहण्यामुळे फुफ्फुसांची क्षमता वाढते. त्याचबरोबर शरीराच्या सर्व मांसपेशींची शक्ती वाढते. शरीरात आजार निर्माण करणाऱ्या कॅलरीज याद्वारे कमी होतात. शरीराचे वजनही घटते. वाढत्या उकाड्यामुळे उन्हाळ्यात व्यायाम करताना घामाने जीव मेटाकुटीला येतो. त्यावेळी पोहण्याने शरीराला थंडावा मिळण्याबरोबरच नवी ताकद मिळते. त्यामुळेच पोहण्याला आरोग्याचा जवळचा मित्र किंवा राजमार्ग मानले जाते.

अन्य व्यायामांच्या तुलनेत पोहणे हा प्रभावी व्यायाम प्रकार आहे. तसेच सर्व वयोगटातील व्यक्ती आरामात करू शकतात. पोहण्यामुळे आपल्या संपूर्ण शरीराला व्यायाम मिळतो. सांध्यांवर ताण न येऊ देता श्वसन, हृदय, रक्ताभिसणाच्या कार्यात सुधारणा घडवून आणली जाते. म्हणून कडक उन्हाळ्यात तीव्र उकाड्यामध्ये शरीराला थंडावा देणाऱ्या जलतरणाला प्राधान्य दिले पाहिजे.

अन्य एरोबिक व्यायाम प्रकाराच्या (पळण्यासह) तुलनेत पोहण्याचा व्यायाम करताना शरीराच्या कमरेखालील आणि वरील भागाला एकाच वेळी व्यायाम होतो. शरीरातील सर्व मांसपेशीचा वापर होतो. बॅकस्ट्रोक वगळता जलतरणाच्या सर्व प्रकाराला शरीराच्या वरील भागात, पोट, नितंब, कंबरेपासून पायाचा भाग आणि पावलांसहीत सर्व अवयव, त्यातील मांसपेशींना गतिमानता प्राप्त होते. वजन घटवण्यासाठी पोहणे हा सर्वोत्तम पर्याय आहे. साधारणपणे ६० किलो वजनाची एखादी व्यक्ती रोज एक तास पोहत असेल तर त्या व्यक्तीच्या ५४० ते ६५० कॅलरी जळतात.

**काळजी घ्या :** कोणताही स्वीमिंग पूल निवडण्यापूर्वी त्याची माहिती घ्या. त्या जलतरण तलावातील पाण्याची नियमित तपासणी केली जाते याची खातरजमा करून घ्या. प्रथमच जलतरणासाठी जात असाल तर कोणताही संसर्गजन्य आजार नसल्याची खात्री डॉक्टरांकडून करून घ्या. पोहण्यानंतर किंवा खाज येणे असा त्रास सुरू झाला तर त्याकडे दुर्लक्ष करू नका.

क्लोरिनयुक्त पाण्यात पोहण्याने हृदय विकाराची समस्या उद्भवू शकते असे म्हटले जाते. हा विवादास्पद विषय असला तरी त्यात काही अंशी तथ्य असावे. पाणी निर्जंतुक करण्यासाठी क्लोरीन स्वस्त, सर्वत्र उपलब्ध असणारा पर्याय आहे. असे असले तरी त्याचे प्रमाण ठरलेले आहे. त्यामुळे शास्त्रशुद्ध प्रमाणातील क्लोरीनचा वापर असणाऱ्या पाण्यामध्ये पोहल्याने त्रास होत नाही.



# घोट्याचे दुखणे

हाडे व स्नायूंच्या अनेक दुखण्यांपैकी एक दुखणे आहे. घोट्याच्या मागच्या बाजूला दुखणे, पाऊल टाकता न येणे यालाच घोटा दुखणे असे म्हणतात. हा आजार खूप छोटासा असला तरी आपल्या दैनंदिन जीवनात अडथळा निर्माण करतो. इतका की, रुग्णाला पाऊल हलविणेसुद्धा त्रासदायक वाटते. तसा हा आजार पूर्णतः स्नायूचा आहे. आपल्या पावलांची हालचाल पूर्णपणे पिंढरीवर अवलंबून आहे. पायाची पिंढरी ही गुडघ्याच्या मागच्या बाजूपासून सुरू होऊन घोट्याच्या मागे थोडे खाली टाचेच्या हाडांपर्यंत असते.

पिंढरीच्या स्नायूंचा घोट्याकडे येणारा भाग निमुळता असतो व त्याच्या आकुंचन प्रसरण पावण्यानेच आपण पावलांची हालचाल करू शकतो. ज्या लोकांना अधिक चालण्याचे किंवा उभे राहाण्याचे काम आहे किंवा ज्यांना श्रमाच्या स्वरूपामुळे पावलांवर अतिरिक्त भार येतो जसे खेळाडूंमध्ये हा आजार उद्भवण्याचे प्रमाण अधिक आहे. तसेच स्त्रियांमध्ये हाडांच्या व स्नायूंच्या कमजोरीमुळे हा आजार होऊ शकतो. रुग्णाच्या पिंढरीच्या निमुळत्या भागात स्नायूंना इजा होते किंवा आर्थ्रायटिस असेल, गाऊट म्हणजे युरिक ॲसिड वाढलेल्या रुग्णांमध्ये घोटा दुखायला सुरुवात होते. अनेकदा इन्फेक्शनही होते.

अशावेळी पावलांच्या थोड्या प्रमाणात केलेल्या हालचालींचाही स्नायू घर्षणांनी दुखापत होऊन रुग्णाला वेदना जाणवतात. टाचेच्या वरच्या भागात आणि घोट्याच्या मागे अनेकदा सुजणे, हात लावला तरी दुखणे अशी लक्षणे दिसतात. कधी कधी दुखणे या एका भागाकरिताच असते पण नंतर टाच दुखणे पावलांच्या मध्यापर्यंत दुखणे जाते. अनेक रुग्णांना हे दुखणे दोन्हीही पायांना जाणवते.

शारीरिक तपासणी करून या आजाराचे निदान होते. वरील वेगळ्या तपासणी म्हणजेच एक्स-रे किंवा एमआरआय वगैरे काढण्याची गरज पडत नाही. तसेच रुग्णांना इतर कुठल्या सांध्यांमध्ये आर्थ्राइटिस आहे का? पेशंटचे शारीरिक वजन जास्त आहे का? आपण चुकीच्या चप्पल तर वापरत नाही ना? या सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो. बरेचदा खूपच सपाट थोडेही कुशन नसलेल्या चपला वापरल्यावरही हा आजार संभवतो.

**उपाय व उपचार :** संपूर्ण तपासणी झाल्यानंतर पादत्राणे सुधारणा, रुग्णाचे वजन कमी करणे, तसेच पावलांची हालचाल कमी होईल असे अजून इजा न होणारे उपाय आधी करणे गरजेचे आहे. पावलांना शक्य तितका आराम देणे, बर्फाने शेकणे तसेच थोड्या प्रमाणात वेदनाशामक औषध याचा तात्पुरता इलाज होऊ शकतो. पण पावलांची हालचाल पूर्णपणे थांबवणे शक्य नसल्यामुळे घर्षण होतच राहाते. त्यामुळे वेदनाशामक औषधे किती दिवस घेणार?

फिजिओथेरपीमध्ये याचा संपूर्ण उपाय आहे. फिजिओथेरपी टेपिंगमुळे पिंढरीची ही दुखरी जागा अशाप्रकारे लॉक केली जाते, ज्यामुळे पावलांची हालचाल झाली तरीही घर्षण न होता या स्नायूला आराम मिळतो. त्याशिवाय लेजर थेरपीमुळे हे स्नायू जुळून यायला मदत होते व रुग्णाला आराम मिळतो. फिजिओथेरपी सिटिंग्स मध्ये नियमितता ठेवणे आवश्यक असते. कारण स्नायू जुळून यायला वेळ जातो. खूप जुना आजार असेल स्पालाईंटसुद्धा द्यावा लागतो. आपली दिनचर्या किंवा दैनंदिन काम न सोडताच फिजिओथेरपीद्वारा यावर खात्रीलायक इलाज होतो.

## सोन्याच्या तस्करी प्रकरणी

तपासणीत त्यांनी त्यांच्या शरीरात सोन्याची तस्करी केल्याचे उघड झाले आहे.हे सर्व सहा प्रवासी एकाच सोन्याच्या तस्करी करणाऱ्या कार्टेलमधून जोडलेले आहेत का, त्यांना हे सोने कोणी सुपूर्द केले आणि ही खेप कोणाला मिळणार होती, याचा कस्टम आता तपास करत आहे. या प्रकरणी बोलताना एजन्सीच्या सूत्रांनी सांगितले की, बहुतेक प्रकरणांमध्ये आम्ही, असे निरीक्षण केले आहे की, प्रवासी तस्करीत गुंतण्यासाठी वाहक म्हणून काम करतात. त्यांना तस्करांकडून एकतर मोफत परदेशी सहली किंवा पैसे देण्याचे आश्वासन दिले जाते. आधीही एका तस्कराला अटक : 18 मे रोजी विमानतळ सीमा शुल्क विभागाने (कस्टम) छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर बिहारमधील एका 39 वर्षीय व्यक्तीला दुबईमधून 2.28 कोटी रुपयांच्या 4.265 किलोग्राम सोन्याची तस्करी केल्याप्रकरणी अटक केली होती. प्रवाशाची झडती घेतली असता त्याच्या अंडरवेअरमध्ये जीन्सच्या शिलाईच्या खिशात आणि गुडघ्याखाली लपवून ठेवलेले मेणाच्या स्वरूपात सोन्याच्या पावडरची 9 पॅकेट सापडले.आधीही एका तस्कराने गिळले होते सोने : दोन आठवड्यांपूर्वी कस्टम अधिकाऱ्यांनी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका 30 वर्षीय सोने तस्कराला अटक केली होती. या तस्कराने प्लास्टीकच्या पिशवीत गुंडाळून ठेवलेले 8 गोल्ड बार गिळले होते. सोने गिळल्यामुळे त्याची तब्यत बिघडली होती. त्याला रुग्णालयात दाखल करावे लागले होते. डॉक्टरांनी जेव्हा एक्सरे काढला तेव्हा आरोपीच्या पोटात 3 ते 5 सेंटीमीटर लांबीचे बार आढळून आले होते. हे बिस्किटे आतडींमध्ये अडकले होते.

## पादत्राणांचे ५५ जोड चोरणारे गजाआड

कपूर, शेख यांनी गोदामाचा दरवाजा उचकटला. गोदामातील बूट अणि चपलांचे ५५ जाोडे लांबविले. आहुजा यांनी तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. सीसीटीव्ही चित्रीकरणात संशयित चोरट्यांचे दिसून आले होते. सीसीटीव्ही चित्रीकरणाद्वारे पोलिसांनी चोरट्यांचा माग काढून तिघांना अटक केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक संतोष भांडवलकर तपास करत आहेत.

## ठाण्यात ६ वर्षीय मुलीचा विनयभंग, खून

नुकतेच या प्रकरणाची सुनावणी झाली. आरोपीची तात्काळ सुटका करा : दहा वर्षांपूर्वी ठाणे शहरात एका सहा वर्षा च्या मुलीवर आरोपीने बलात्कार केला. निर्घृ ण तिचा खून देखील केला. यासंदर्भा त त्याला अटक झाली. पुढे ही केस कनिष्ठ न्यायालयात उभी झाली. त्यानंतर हा खटला सर्वोच्च न्यायालयामध्ये पोहोचला. परंतु आरोपी आणि एकूणच डीएनए अहवाल इतर पुरावे यांचे नमुने हे जुळत नाही. त्यामुळे त्याची सुटका करत त्याला दिलेला फाशीचा निर्णय देखील न्यायालयाने रद्द केला. फाशिची शिक्षा रद्द : लहान बालीकेर बलात्कार झाल्यानंतर ठाण्यातीलच कनिष्ठ न्यायालयाने 2014 मध्ये आरोपीने गंभीर गुन्हा केल्या संदर्भा त गुन्हा निश्चित केला होता. कनिष्ठ न्यायालयाने त्याला फाशी द्यावी अशी शिक्षा ठोठावली होती. त्यानंतर आरोपीच्या वतीने 2015 मध्ये मुंबई उच्च न्यायालयामध्ये धाव घेतली होती. परंतु मुंबई उच्च न्यायालयाने देखील त्याची शिक्षा तशीच ठेवली. परंतु मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयास आरोपीच्याकडून सर्वोच्च न्यायालयामध्ये हस्तक्षेप याचिका दाखल केली गेली होती. त्यामुळेच हा खटला कमकुवत झालेला आहे. भक्कम पुराव्या आभावी आरोपीला दोषी सिध्द करणे हे अत्यंत जिकरीचे काम झालेले आहे. असे खंडपीठाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी निकाल देताना नमूद केलेल आहे. त्यामुळेच त्या आरोपीची फाशी देखील रद्द करत अखेर सर्वोच्च न्यायालयाने सुटका देखील केलेली आहे.

## मोबाईल, दागिन्यांनंतर

शेख यांना अटक केली आहे. काय आहे प्रकरण? पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आहूजा यांचे खडकी बाजार भागात चपलेचे गोडाऊन आहे. शनिवारी (20 मे) गोडाऊन बंद केल्यानंतर रात्री या तीन तरुणांनी गोडाऊनचे शटर उचकटून आत प्रवेश केला आणि हाताला दिसेल आणि मिळतील तसे बूट आणि चप्पल असे एकूण 55 चप्पल आणि बूट चोरी करुन पसार झाले. अशिक्षित असल्यामुळे या तरुणांनी उदरनिर्वा हतसंच दारु पिण्यासाठी ही चोरी केल्याचं प्राथमिक तपासातून निष्पन्न झाले आहे. खडकी पोलीस ठाण्यात या तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर पोलिसांनी तीन जणांना अटक केली आहे. पुण्यात गेल्या काही महिन्यांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. एकीकडे कोयता गँगची दहशत असतानाच दरोडा, मोबाईल फोन, दागिन्यांच्या चोरीच्या घटना वाढत आहेत. त्यातच आता चोर चोरीसाठी नव्या वस्तूंचा आधार घेताना दिसत आहेत. उदरनिर्वा हासाठी तसंच इतर कारणांसाठी आता चप्पलची चोरी करण्याचा प्रकार समोर आला आहे.पिंपरखेडमध्ये मध्यरात्री घरावर सशस्त्र दरोडा शिरुर तालुक्यातील पिंपरखेड इथल्या दाभाडेमळा परिसरात सात ते आठ चोरट्यांनी बाळू नावजी दाभाडे यांच्या घरावर दरोड टाकला होता. यावेळी दरोडेखोरांनी शस्त्रांचा धाक दाखवून महिलांच्या अंगावरील दहा तोळे सोन्याचे दागिने चोरुन नेत पोबोरा केला. त्यांनी आणखी एका घरात प्रवेश करुन सोन्याचा वेल आणि पाच हजार रुपये रक्कम असा एकूण पाच लाखांचा ऐवज घेऊन पलायन केल्याची 18 रोजी पहाटे घडली होती. या घटनेने पिंपरखेड परिसरात खळबळ उडाली आहे. मोबाईल चोरी करणाऱ्या उच्चशिक्षित तरुणाला अटक रामटेकडी इथल्या डिजीटल हबमध्ये परीक्षा देण्यासाठी आलेल्या परीक्षार्थींच्या बॅगेतील मोबाईल चोरी करणाऱ्या उच्चशिक्षित तरुणाला पाच दिवसांपूर्वी वानवडी पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून चोरीला गेलेल्या मोबाईलसह इतर ऐवज असा एकूण 96 हजार 500 रुपयाचा ऐवज जप्त करण्यात आला. ऋषिकेश प्रभाकर पाटील असं आरोपीचं नाव असून जो मूळचा जळगावचा आहे. खडकीतील महिलेच्या हत्येचा उलगडा, एकतर्फी प्रेमातून खून पुण्यातील खडकीमध्ये महिनाभरापूर्वी महिलेवर चाकूने हल्ला करुन खून केल्याप्रकणी आरोपींना कर्ना टकातील विजापूरमध्ये अटक करण्यात आली. एकतर्फी प्रेमातून आरोपी

## जबरी चोरी, घरफोड्या करणारी

आरोपी 4 मे रोजी पुन्हा चेन स्नॅचिंगसाठी कोल्हापुरात येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर राष्ट्रीय महामार्गा वर लक्ष्मी टेकडीजवळ सापळा रचण्यात आला. ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी खाक्या दाखवल्यानंतर कोल्हापुरातील चेन स्नॅचिंगची कबूली दिली. त्यानंतर अधिक चौकशी केली असता साथीदारांची नावे निष्पन्न झाली. एकूण 36 गुन्हे उघडकीस या आंतरराज्य टोळीकडून केलेल्या तपासामध्ये कोल्हापूर जिल्ह्यात 12 गुन्हे, कर्ना टक राज्यात 05 गुन्हे असे चेन स्नॅचिंगचे एकूण 17 गुन्हे, घरफोडीचे कोल्हापूर जिल्ह्यात 14 गुन्हे, सोलापूर जिल्ह्यात 01 गुन्हा व कर्ना टकराज्यात 02 गुन्हे असे घरफोडी चोरीचे एकूण 17 गुन्हे, बेकायदेशीर 9 mm पिस्टलचे 24 जिवंत राऊंड व एक मॅगझिन कब्जात बाळगल्याप्रकरणी 1 गुन्हा तसेच पल्सर मोटरसायकल चोरीचा 1 गुन्हा असे एकूण 36 गुन्हे उघडकीस आले आहेत. सदर आरोपींकडे अजूनही तपास सुरु असून त्यांचेकडून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने हस्तगत करणेची प्रक्रिया सुरु आहे. त्यांच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

## भिवंडीत सात अ◪ल गुहेगारांकडून

मोहम्मद सैफ शफिक खान (वय 24 वर्षे, शांतीनगर भिवंडी) ,राहील फकीरउल्ला अन्सारी (वय 26 वर्षे, रा. गौबीनगर भिवंडी) असे वाहने चोरीच्या गुन्ह्यात अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. विशेष म्हणजे भिवंडीतील दोन आरोपी हे शहरातील दुचाक्यांसह रिक्षांची चोरी करुन मालेगाव भागात विक्री करत असल्याचे पोलीस तपासात समोर आले. या गुन्हेगार त्रिकूटाकडून 19 वाहन चोरीचे गुन्हे आतापर्यंत उघडकीस आले असून या गुन्ह्यात आणखी काही आरोपी असल्याची शक्यता पोलीस अधिकाऱ्यांकडून वर्तवण्यात आली आहे. या तीन गुन्हेगारांपैकी बिलाल याला तांत्रिक आणि बातमीदारच्या आधारे मालेगावातून सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र म्हात्रे, संतोष तपासे, पोलीस हवालदार रविंद्र चौधरी, महेश चौधरी, रिजवान सैयद, पोलीस नाईक किरण जाधव, श्रीकांत पाटील, किरण मोहिते, पोलीस शिपाई रविंद्र पाटील, नरसिंह क्षीरसागर, दीपक सानप, मनोज मुके, तौफिक शिकलगार, विजय ताटे या पोलीस पथकाने सापळा रचून अटक केली. त्यानंतर त्याने वाहने चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्याचे भिवंडीत राहणाऱ्या दोन साथीदारांचा शोध घेऊन त्यांनाही अटक केली. या अटक गुन्हेगारांकडून 14 दुचाक्या, 4 रिक्षा असे 18 वाहने आतापर्यंत जप्त करण्यात आली आहे. या गुन्हेगारांनी शहरातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत 19 वाहने चोरी केल्याचे समोर आले असून यापूर्वीही शांतीनगर पोलीस पथकाने 19 वाहन चोरीचे गुन्हे उघकीस आणले असून एकूण 38 वाहन चोरीचे गुन्हे महिन्याभरात उघडकीस आणले आहे. या अटक गुन्हेगारांकडून 7 लाख 90 हजार रुपये किंमतीचे वाहने आतापर्यंत जप्त करण्यात आली आहे.

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
३
मुंबई, मंगळवार २३ ते २९ मे - २०२३

संपादकीय...



# थोडी खुशी, थोडी निराशा...

येत्या २६ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला नऊ वर्षे पूर्ण होत आहेत. सरकार कोणाचेही असो, त्यांचा वचननामा आणि प्रत्यक्षात कृती याचा कधीच ताळमेळ नसतो. पुन्हा निवडणुकांना सामोरे जाण्याची वेळ येते तेव्हा वचननाम्याच्या पूर्ततेसाठी सरकारला धडपडावे लागते. 'भ्रष्टाचारी काँग्रेस' असे मतदारांच्या मनात खोलवर रुजवत २०१४मध्ये भाजप बहुमताने सत्तेत आले. दिलेल्या घोषणांची पूर्तता करण्यासाठी मोदींना २०१९मध्ये पुन्हा संधी देण्यात आली. लोकसभेतील संख्याबळही वाढवून मिळाले.

परंतु दरवर्षी दोन कोटी नोकऱ्या देणे, महागाई घटवणे, भ्रष्टाचारमुक्त भारत, काळा पैसा परत आणण्याचे आश्वासन आणि 'सबका साथ-सबका विकास'चे दिलेले वचन यात मोदी सरकारची पाटी कोरीच राहिली. असे असले तरी कोविड-१९ सारख्या विषाणूचा सामना करताना मोदी सरकारने स्थिती हाताळण्याचा केलेला प्रयत्न उल्लेखनीय होता. या महासाथीत साऱ्या जगाची वीण विस्कटली, भारतालाही मोठा फटका बसला.

लाखो लोकांच्या नोकऱ्या गेल्या. महागाईने कळस गाठला. मात्र, देशातील ८०कोटी लोकांना मोफत धान्य पुरविणे, घर तिथे शौचालय, प्रत्येक घराला नळाद्वारे पाणी, उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून घरोघरी गॅस, आयुष्यमान भारत यांसारख्या योजना मोदी सरकारला जमेच्या बाजू वाटतात. धनदांडग्यांच्या प्रेमातून बाहेर पडत निवडणुकीच्या आधी सरकारला लाखोंच्या संख्येत रोजगार निर्मिती करावी लागणार आहे. महागाई नियंत्रणात आणावी लागेल. केवळ ध्रुवीकरणाला मतदार नेहमीच बळी पडत नाहीत, हे कर्नाटकच्या निकालाने मोदी सरकारला दाखवून दिले आहे.

उल्लेखनीय कामगिरी

कर्नाटक विधानसभेची निवडणूक हरल्याने भाजपला चांगलाच हादरा बसला आहे. लोकसभा निवडणुकीला जेमतेम अकरा महिने उरले आहेत. अलीकडेच भाजपच्या नेत्यांची बैठक झाली. येत्या ३०मेपासून ३०जूनपर्यंत केंद्रीय मंत्र्यांना देशभर पाचशे सभा घेण्याचे फर्मान सोडण्यात आले आहे. नऊ वर्षांत मोदी सरकारने कोणती विकासकामे केली, याचे त्यांनी सादरीकरण करायचे आहे. त्यात जनधन योजनेचा विशेषत्वाने उल्लेख होईल.

१५ऑगस्ट २०१४रोजी सुरू झालेल्या या योजनेत ४९ कोटी लोकांचे खाते उघडण्यात आले. १मे २०१६रोजी सुरू केलेल्या उज्ज्वला योजनेंतर्गत आतापर्यंत नऊ कोटींवर एलपीजी कनेक्शन देण्यात आले. पंतप्रधान किसान योजना २४फेब्रुवारी २०१९रोजी सुरू करण्यात आली. यात शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये दिले जातात.

ही योजना सुरू झाल्यापासून दोन लाख कोटींवर निधीचे वाटप झाले आणि त्याचा लाभ आठ कोटींवर शेतकऱ्यांना मिळत आहे. सगळ्या आकड्यांचे दावे हे सरकारचे आहेत. भाजप नेत्यांना मतदारांपुढे जाताना या गोष्टी जोरकसपणे मांडण्याची वेळ आली आहे. मोदी सरकारपुढे हक्काने सांगण्यासारखे आणि लोकांना प्रत्यक्षात दिसणारे एकच विकास काम आहे आणि ते म्हणजे राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी देशभर उभारलेले रस्ते आणि महामार्गांचे जाळे! २०१३च्या तुलनेत गेल्या नऊ वर्षांत त्यांनी १५९ टक्के अधिक राष्ट्रीय महामार्गांची बांधणी केली. दर दिवशी ३७ किलोमीटर महामार्ग बांधून त्यांनी जागतिक विक्रम केला आहे.

कोरोनानंतर मोदी सरकारने पंतप्रधान गरीब कल्याण योजना सुरू केली. २६मार्च २०२०रोजी सुरू झालेल्या या योजनेत देशातील ऐंशी कोटी लोकांना उपाशी राहू नये म्हणून दरमहा प्रत्येकी पाच किलो धान्य मोफत दिले जाते. ही योजना येत्या लोकसभा निवडणुकीपर्यंत चालेल. त्यावर आतापर्यंत ५.९१लाख कोटी रुपये खर्च केल्याचे सांगितले जाते. यानिमित्ताने देशातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या ८० कोटी असल्याचे सरकारच स्वीकारत आहे.

गेल्या नऊ वर्षां तया आकड्यात झालेली लक्षणीय वाढ देशाच्या विकासाचे द्योतक असू शकते का? लोकांचा जीवनस्तर उंचावण्यात सरकार अपयशी ठरले, असा आरोप लावणे विरोधकांनी चालू केले आहे. कोरोनामुळे जो आर्थिक फटका बसला त्यातून सावरायला देशाला एक तप लागेल. २०२०-२१मध्ये देशाचे तब्बल १९.१लाख कोटी रुपयांचे,

तर कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत २०२१-२२या वर्षात १७.१लाख कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे रिझर्व्ह बँकेने नोंदवले आहे. यातून सावरण्याचे सरकारचे प्रयत्न अपुरे पडताना दिसतात. नवीन संसद भवन, राम मंदिर याच्याही मतदारांना आकर्षित करणाऱ्या रंजक कथा भाजपकडून सांगितल्या जातील.

कर्नाटकातील निवडणूक निकालानंतर दक्षिणेत भाजप संपली, अशी विरोधकांमध्ये चर्चा आहे. त्यांनी महागाई, भ्रष्टाचार आणि बेरोजगारी या मुद्यांवर सरकारला घेरण्याची तयारी चालवली आहे. नोटाबंदीनंतर चलनात आणलेल्या दोन हजार रुपयांच्या नोटा बाद केल्याने काळ्या पैशांचा मुद्दा पुन्हा जोर धरणार आहे. भाजपच्या वचननाम्यातील 'स्वप्नरंजन आणि सत्य' याची आकडेमोड केली जाणार आहे. नरेंद्र मोदी हे डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर धोरण लकव्याचा आरोप करून खिल्ली उडवत होते.

परंतु मोदी सरकारच्या काळात धोरणच नसल्याचे दिसून येते. नोटाबंदीचा निर्णय का घेतला? याचे सरकारने अद्यापही ठोस कारण दिले नाही. ५०दिवसांनंतर चौकात शिक्षा घ्यायला तयार असलेले मोदी आता नोटाबंदीचे नावही काढत नाहीत. चीनबद्दल काय धोरण आहे, हेही स्पष्ट नाही.

# सुशासन नियमावली ठीक, पण महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम- 2015चे वास्तव काय?

महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि पात्र व्यक्तींना लोकसेवा देणाऱ्या शासकीय विभागांमध्ये व अभिकरणांमध्ये आणि इतर सार्वजनिक प्राधिकरणांमध्ये पारदर्शकता व उत्तरदायित्व आणण्यासाठी आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी एक सर्वसमावेशक कायदा करण्यासाठी 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश,२०१५' राज्यपालांच्या स्वाक्षरीने २८ एप्रिल २०१५ रोजी काढण्यात आला. अध्यादेश हा असा कायदा असतो जो राज्यपालांनी राज्य मंत्रिमंडळाच्या शिफारशीनुसार जारी केलेला असतो. राज्य विधिमंडळाचे अधिवेशन चालू नसताना अध्यादेश जारी केले जाऊ शकतात. अध्यादेश यासाठी जारी करतात की त्यामुळे सरकारला त्वरित कायदेशीर कारवाई करण्यास सक्षम करता येते. ज्याअर्थी अध्यादेश काढून 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५' लागू करण्याची निकड सरकारला भासली याचा अर्थ या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी प्राधान्याने करण्याची घाई होती. जो कायदा अध्यादेश काढून लागू करण्यात आला त्याची अंमलबजावणी तितक्याच गंभीरपणे व परिणामकारकरित्या होणे अपेक्षित होते.



राज्याचे नागरिक शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारी महामंडळे व इतर संस्था यांच्या कडून ज्या सेवा घेतात त्यात राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र, मिळकतीचा दाखला, जन्म/मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र ,जातीचा दाखला इत्यादि विविध लोकसेवांचा समावेश होतो. या लोकसेवा राज्यातील जनतेला किती प्रभावीपणे व गतीने पुरविल्या जातात याचे मूल्यांकन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक (कॅग) यांनी केले व त्याबाबतचा अहवाल नुकताच गेल्या अधिवेशनात २५ मार्च २०२३ रोजी राज्य विधिमंडळाला सादर करण्यात आला. हा अहवाल २०१५-१६ ते २०२०-२०२१ या कालावधीचा असून हा अहवाल राज्यातील महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीवर प्रकाश टाकतो.

राज्य शासनाच्या विविध विभागांच्या लोकसेवांच्या वितरणावर पर्यवेक्षण, संनियंत्रण, नियमन व सुधारणा करण्यासाठी 'महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगा'ची स्थापना करण्यात आली. नागरिकांना प्रभावी, कुशल आणि कालमर्यादित सेवा पुरविण्यात आल्या किंवा कसे, लोकसेवा ऑनलाईन देण्यासाठी केलेले नियोजन आणि आयोगाकडून कार्यक्षम संनियंत्रण व प्रभावी तक्रार निवारण केले गेले किंवा नाही याचे लेखापरीक्षण करण्यात आले. कॅगचा अहवाल महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीतील अनेक त्रुटींवर बोट ठेवतो व त्यावर भाष्य करतो.

या अहवालात खालील निरीक्षणे नोंदण्यात आली आहेत :

(१) सार्वजनिक प्राधिकरणांनी ते वितरीत करीत असलेल्या सेवांची यादी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करावयाची होती, परंतु शासनाच्या २९ विभागांपैकी फक्त ११ विभागांनी निर्धारित कालावधीत सेवांची यादी अधिसूचित केली.

(२) सेवा वितरणासाठी पायाभूत सुविधा स्थापन करण्याचा एक भाग म्हणून सामान्य सेवा केंद्रांची निर्मिती करण्यात आली होती व ही केंद्रे २०१५ पासून आपले सरकार सेवा केंद्रे म्हणून ओळखली जाऊ लागली. 'आपले सरकार सेवा केंद्र' स्थापन करण्यासाठी जे निकष निश्चित केले होते त्या निकषानुसार जेवढी केंद्रे स्थापन करावयाची होती तेवढी केंद्रे स्थापन केली नाहीत. राज्यातील २२२ पैकी ६१ नगरपरिषदा तसेच राज्यातील ३५ टक्के ग्राम पंचायतींमध्ये आपले सरकार सेवा केंद्रे स्थापन झाली नाहीत. जी केंद्रे स्थापन झाली होती त्यातील बरीचशी केंद्रे अधिसूचित सेवा पुरवीत नव्हती.

(२) सेवा केंद्रांवर कोरे अर्ज पुरविले जात होते. या अर्जांचे शुल्क किती असावे याचे निर्देश नसल्याने वेगवेगळ्या केंद्रांवर शुल्क आकारणीत एकसारखेपणा नव्हता.

(४) या सेवा केंद्रांचे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून गुणवत्ता मुल्यांकन होणे अपेक्षित होते परंतु काही अपवाद वगळता ते झाले नाही.

(५) सेवेचे प्रदान विहित मुदतीत झाले किंवा कसे याची पडताळणी केली असता असे निदर्शनास आले की ते सेवेचे प्रदान विहित मुदतीत झाले नाही व बऱ्याच कालावधीसाठी अर्ज प्रलंबित होते.

(६) असे आढळले की महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवा,सेवा वितरणाचा कालावधी, नियुक्त प्राधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकरण याविषयी ६३ टक्के लाभार्थी अनभिज्ञ होते. महाराष्ट्र लोक सेवा हक्क कायद्याची माहिती जनजागृती अभावी जनसामान्यांपर्यंत पोहोचली नव्हती ही बाब अहवालात ठळकपणे मांडली आहे. या कायद्यांतर्गत नागरिकांना मिळालेल्या अधिकारांची जाणीव जनतेला करून देण्याबरोबरच लोक सेवा वितरण करणाऱ्या प्राधिकरणांना त्यांच्यावरील जबाबदारीचे पालन करण्यास प्रोत्साहित करण्याची निकड अहवालात अधोरेखित केली आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या कलम १३ नुसार स्थापन झालेला आयोग, सेवा देण्यात झालेल्या विलंबाबाबतच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी अंतिम अपिलीय प्राधिकरण आहे. या आयोगावर महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीचे निरीक्षण करण्याची जबाबदारी आहे. परंतु असे आढळले की वितरणाची जबाबदारी सोपवलेल्या सर्व कार्यालयांची तपासणी आयोगाने केली नाही. या आयोगाबाबत इतरही भाष्य 'कॅग'ने अहवालात केले आहे, ते याठिकाणी मांडणे विस्तार भयास्तव टाळले आहे.

राज्याच्या सुशासन नियमावलीस शासनाने १९ मे रोजी मान्यता दिल्याचे वाचनात आले. ही नियमावली देशातील वैशिष्ट्यपूर्ण नियमावली आहे असा शासनाचा दावा आहे. यात 'आपले सरकार सेवा केंद्रां'ची व्याप्ती वाढविण्यावर भर दिला आहे. या नियमावलीची अंमलबजावणी करण्याबरोबरच कॅगच्या अहवालात नमूद केलेल्या त्रुटींची व कायद्याच्या अंमलबजावणीतील ढिसाळपणाच्या बाबींची दखल शासनाने गांभीर्याने घ्यायला हवी. कारण की कॅगच्या अहवालात दर्शवलेल्या त्रुटी दूर झाल्या तरच ज्या उद्देशाने महाराष्ट्र लोकसेवा कायदा अध्यादेश काढून अंमलात आणला गेला तो उद्देश मोठ्या प्रमाणात सफल झालेला दृष्टोत्पतीस येईल. तसेच राज्याचे प्रशासन अधिक गतिमान, सुलभ आणि पारदर्शी होण्यास हातभार लागेल.

# अंमली पदार्थांचा वापर व विक्री रोखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा - जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या सूचना

ठाणे, - ठाणे जिल्ह्यात अंमली पदार्थांचा वापर, विक्री व साठा रोखण्यासाठी जिल्ह्यातील बंद पडलेले कारखाने, गोदामे येथे तपासणी करावी. तसेच यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा व इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर करावा. अंमली पदार्थांच्या वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी यंत्रणा तयार करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी आज येथे दिले.

नार्को कोऑर्डिनेशन सेंटर समिती व जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक जिल्हाधिकारी श्री. शिनगारे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक विक्रम देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, उत्पादन शुल्क अधिक्षक निलेश सांगडे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दीपक कुटे, अन्न व औषध प्रशासनचे सहाय्यक आयुक्त राजेश चौधरी, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणाली राठोड, वस्तू व सेवाकर अधिक्षक अंबरिश शिंदे, टपाल कार्यालयाच्या सहाय्यक अधिक्षक अमिता कुमारी, प्र. जिल्हा माहिती अधिकारी नंदकुमार वाघमारे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक सुरेश मनोरे आदी यावेळी उपस्थित होते.

पोलीस अधिक्षक श्री. देशमाने यांनी जिल्हा पोलीस यंत्रणांमार्फत अंमली पदार्थांचा वापर, विक्री व वाहतूक रोखण्यासाठी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. जिल्ह्यातील मुरबाड व शहापूर येथील औद्योगिक वसाहतींमध्ये तपासणी करण्यात आली आहे. तसेच बाहेर देशातून येणाऱ्या टपालावर लक्ष ठेवण्यात येत आहे. तसेच आता शाळा सुरू झाल्यानंतर शाळांमध्ये विद्यार्थ्यांना माहिती देऊन जनजागृती करण्यात येणार असल्याचे श्री. देशमाने यांनी सांगितले. जिल्हाधिकारी श्री. शिनगारे म्हणाले की, अंमली पदार्थांमुळे तरुणांचे जीवन वाया जात असून त्यांच्या कुटुंबांवर सुद्धा त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे अशा पदार्थांना रोखण्याची आपली जबाबदारी असून सर्व संबंधित विभागांनी सतर्क रहावे. अंमली पदार्थांच्या वाहतूक, विक्री व सेवनावर आळा घालण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा. तसेच यासाठी विशेष यंत्रणा तयार करावी. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर कारखाने, गोदामे आहेत. अशा ठिकाणांचा वापर अंमली पदार्थांच्या निर्मितीसाठी होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशी ठिकाणे शोधून कारवाई करण्यात यावी. संभाव्य जागांवर स्थानिक लक्ष ठेवावे.

उद्योग विभागाकडून जिल्ह्यातील बंद पडलेल्या, वापरात नसलेले कारखाने, गोदामे यांची माहिती घेऊन त्यासाठी सतत लक्ष ठेवण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

# भावपूर्ण वातावरणात मेजर कौस्तुभ राणे यांना स्वातंत्र्यवीर सावरकर शौर्य पुरस्कार मरणोपरांत प्रदान

## डॉ. अभय करंदीकर, 'मैत्री परिवार' व प्रदीप परुळेकर देखील स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्काराने सन्मानित
## सावरकर यांच्यावरील ऐतिहासिक अन्याय दूर करावा : राज्यपाल रमेश बैस

स्वातंत्र्यवीर सावरकर हे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे महान नायक होते. ते द्रष्टे समाज सुधारक व जातीभेदाचे कट्टर विरोधक होते. दुर्दैवाने स्वातंत्र्योत्तर काळात सावरकर तसेच इतर अनेक क्रांतिकारकांच्या योगदानाकडे डोळेझाक करण्यात आली. खोट्या सिद्धांताच्या आधारे अनेक क्रांतिकारकांना बदनाम करण्यात आले. क्रांतिकारकांवरील हा अन्याय दूर करण्याची वेळ आली असून सर्वच क्रांतिकारकांचा यथोचित सन्मान झाला पाहिजे, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी येथे केले.




स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकातर्फे देण्यात येणारे २०२३ वर्षाचे 'स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कार' राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते रविवारी (दि. २१) स्मारकाच्या दादर येथील सभागृहात प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

हुतात्मा मेजर कौस्तुभ राणे यांना यावेळी 'स्वातंत्र्यवीर सावरकर शौर्य पुरस्कार' मरणोपरांत प्रदान करण्यात आला. भारावलेल्या वातावरणात झालेल्या पुरस्कार सोहळ्यात मेजर राणे यांच्या आई वीरमाता ज्योती राणे यांनी हा पुरस्कार राज्यपालांकडून स्वीकारला.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या निःस्वार्थ कार्याला कुणी नाकारत तर देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांचे कार्य तसेच वीरमरण प्राप्त झालेल्या सैन्य दलातील अधिकारी व जवानांचे बलिदान देखील नाकारल्यासारखे होईल व ही गोष्ट कोणतीही देशप्रेमी व्यक्ती सहन करणार नाही असे राज्यपालांनी सांगितले.

सावरकरांची जन्मभूमी असलेल्या भगूर येथे त्यांचे भव्य स्मारक व्हावे तसेच 'ने मजसी ने' व 'जयोस्तुते' या सावरकरांच्या रचना शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केल्या जाव्या अशी सूचना राज्यपालांनी केली.

राज्यपालांच्या हस्ते आयआयटी कानपूरचे संचालक डॉ. अभय करंदीकर यांना 'स्वातंत्र्यवीर सावरकर विज्ञान पुरस्कार' देण्यात आला, तर नागपूर येथील 'मैत्री परिवार' या संस्थेला 'स्वातंत्र्यवीर सावरकर समाजसेवा पुरस्कार' देण्यात आला. स्वातंत्र्यवीर सावरकर विचारांच्या प्रचार व प्रसार कार्यासाठी प्रदीप परुळेकर यांना 'स्वातंत्र्यवीर सावरकर स्मृती चिन्ह' पुरस्कार देण्यात आला.

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजीत सावरकर यांनी प्रास्ताविक केले तर स्मारकाचे अध्यक्ष व निवृत्त पोलीस महासंचालक प्रविण दीक्षित यांनी आभार प्रदर्शन केले. ज्योती राणे यांनी कृतज्ञता सोहळ्याला उत्तर दिले. स्मारकाचे कार्यवाह राजेंद्र वराडकर, विश्वस्त मंजिरी मराठे व स्वप्नील सावरकर तसेच इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# अकरावीच्या प्रवेशासाठी आधार क्रमांक सक्तीचा करा

## महाराष्ट्र राज्य कनिष्ट महाविद्यालयीन शिक्षक संघ

राज्य शिक्षण विभागाने संच मान्यतेच्या नावाखाली विद्यार्थ्यांची आधार कार्डची माहिती नसलेल्या अनेक शाळांचे अनुदान रोखले असून शिक्षकांची सेवा संपली आहे. त्यामुळे अशी परिस्थिती अकरावीच्या शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांवर ये ऊ नये म्हणून अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांना आधार कार्ड क्रमांक सादर करण्याची सक्ती करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य कनिष्ट महाविद्यालयीन शिक्षक संघटनेकडून करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या दहावी-बारावीच्या परीक्षेचा निकाल पुढच्या आठवड्यात जाहीर होणार असून त्याआधी अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेची नोंदणी २५ मे २०२३ पासून सु रू होणार आहे. ही प्रक्रिया सु रळीतपणे पार पडावी म्हणून शिक्षण विभागाच्या वतीने मोठा परिश्रम घेण्यात येतो. शालेय शिक्षण विभागाची परिस्थिती पाहिली, तर शिक्षकांना आपली नोकरी वाचविण्यासाठी गावोगावी विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची माहिती गोळा करण्यात दिवस जात आहे. त्यामुळे ही परिस्थिती अकरावीचा अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयांवर ये ऊ नये म्हणून काही उपाययोजना करण्याची गरज आहे.



अकरावीच्या प्रवेशासाठी दहावीच्या गुणपत्रिकासोबत आधार कार्डची संपूर्ण माहिती सक्तीची करण्यात यावी. शिक्षण विभागाकडून संच मान्यतेसाठी घेण्यात आलेल्या निर्णयामुळे अनेक शाळांमधील हजारो विद्यार्थी शाळाबाह्य झाले आहेत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांची संख्या कमी झाल्यामुळे शिक्षक सुद्धा अतिरिक्त झाले आहेत. त्यामुळे अशी अडचण कनिष्ठ महाविद्यायांवर येऊ नये म्हणून अकरावीच्या प्रवेशावेळीच विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची माहिती सक्तीची करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य कनिष्ट महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे समन्वयक मुकुंद आंधळकर यांनी केली आहे.

# मुंबईकरांनो सावधान! घरफोड्या करणा-या मोलकरीण गँगचा पोलिसांकडून पदार्फाश, महिलांची टोळी गजाआड

मुंबई : मुंबईकरांसाठी (Mumbai News) एक अतिशय महत्त्वाची बातमी आहे. मुंबईत सध्या मोलकरीण गँग सक्रिय झाली आहे. घरकाम करताना चोरी करणाऱ्या तीन महिलांना वांद्रे पोलिसांनी अटक केली आहे.. तिघींच्या घरून एकूण 50 लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. घरात कामं करताना त्या कपाट किंवा तिजोरीची डुप्लिकेट चावी बनवायच्या आणि मग काही दिवसांनी मोका साधून चोरी करत फरार व्हायच्या. ज्येष्ठ नागरिकांना टार्गेट करण्यावर त्यांचा अधिक भर असायचा. घरकामाच्या नावाने घरात प्रवेश करून संधी मिळत चोऱ्या करत आहेत. नुकत्याच झालेल्या एक प्रकरणात मुंबईमधील बांद्रा पोलिसांनी तीन महिलांना अटक केली आहे. घरकाम करण्याच्या नावाखाली हे महिला घरात शिरतात आणि मग विश्वास संपादन करून चोरी करतात अशी ही घटना समोर आली आहे. मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांच्या घरी काम करायचं आणि मग चोरी करायची. त्या महिलांनी वांद्र्यातील एका ज्येष्ठ नागरिकाच्या घरी चोरी केल्यानंत झाल्यानंतर वांद्रे पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू करत या महिलांचा शोध सुरू केला. पोलिसांनी या तिन्ही महिलांकडून सोन्याचे दागिने किंमत 35, 93, 700 रूपये तसेच चार मनगटी घड्याळे किंमत 20,000 रुपये आणि रोख रक्कम 3,54,600 रुपये अशी एकूण 39, 68, 300 रूपयांची मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे. अटक महिला आरोपीत निर्म लाआप्पासाहेब कांबळे (36 वर्ष), गुलजार मकबुल शेख (40 वर्षे) अनिषा जानी शेख (45 वर्ष) आहे.



### कशा करत होत्या चोरी?

- घरकाम करण्याच्या नावाखाली घरात शिरायचं
- विश्वास संपादन करून घरातील मौल्यवान वस्तूंची माहिती काढायची
- मग घरातील लॉकर व दरवाजाची डुप्लिकेट चावी तयार करायची आणि संधी साधून चोरी करायच्या
- बनावट चावीच्या मदतीने या महिलेने सोन्याच्या आणि हिऱ्याच्या दागिन्यांची चोरी केली
- लाखो रुपयांची रोकड घेऊन झाल्या फरार

### वृद्धाचा खून करून घरात चोरी करणाऱ्या केअर टेकरला अटक

मुंबईच्या सांताक्रुझ भागामध्ये एका 85 वर्षा च्या वृद्ध माणसाची त्याच्या घरात काम करणाऱ्या केअर टेकरने हत्या केल्याची खळबळजनक घटना सोमवारी (8 मे) घडली होती. कृष्णा मनबहादूर पेरियार (30 वर्ष) असे अटक करण्यात आलेल्या केअर टेकर नोकराचं नाव आहे. हेल्थ केअर अॅट होम या प्लेसमेंट एजन्सीकडून नाईक दांपत्याने त्याला देखरेख करण्यासाठी नेमले होते. आठच दिवसापूर्वी हा नोकर म्हणून नाईक यांच्या घरी कामावर रुजू झाला होता.

# सौदागर मोहल्ल्यात राहून 'तो' बाजरपेठमध्ये करायचा नशेच्या विक्रीचा सौदा



ठाणे : भिवंडी शहर, ग्रामीण भागात अंमली पदार्थांसह अमली पदार्थांची विक्री करणारे अमली पदार्थ विक्रेते मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे शेकडो युवक अंमली पदार्थांच्या आहारी जात आहे. स्थानिक भिवंडी पोलीस प्रशासन गेल्या काही महिन्यांपासून ॲक्शन मोडवर आले आहे. पोलीस उपआयुक्त नवनाथ ढवळे यांच्या मागर्शनाखाली शहरातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बहुतांश नशेच्या सौदागरांना जेलमध्ये डांबण्यात आहे. मात्र, काही दिवसापासून पुन्हा नशेचे सौदागरानी नश्या विक्रीचा सौदा सुरू असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती.अंमली पदार्थाचा गोरखधंदा : या माहितीच्या आधारे भिवंडी पोलिस परिमंडळ क्षेत्रात अंमली पदार्थाचा गोरखधंदा करणाऱ्या सौदागरांवर कारवाई करण्याचे सक्त आदेश पोलिस आयुक्तांनी दिले आहेत. त्यातच भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन गायकवाड यांना (एमडी) हा मादक पदार्थ विक्रीचा गोरखधंदा करणारा येत असल्याची माहिती मिळाली होती. भिवंडीतील मंडई भागातील बाजारपेठ येथील नवी चाळ या ठिकाणी आमली पदार्थ विक्री करणार होते. 16.50 ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन जप्त : या माहितीच्या आधारे १९ मे रोजी गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय मोरे, प्रफुल्ल जाधव, धनराज केदार, पोलीस उपनिरीक्षक रमेश शिंगे , रामसिंग चव्हाण , साहाय्यक पोलीस उपनिरिक रामचंद्र जाधव, पोलीस नाईक सचिन जाधव, भावेश घरत,

# बेकायदेशीरपणे पिस्तूल खरेदी-विक्री करणाऱ्या दोघांना अटक

**डोंबिवली** गावठी पिस्तूल विकण्यासाठी आलेल्या एका तरुणास मानपाडा पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. अटक केलेल्या तरुणाकडून पोलिसांनी गावठी पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुस हस्तगत केली. तरुणाने या आधी सातारा येथे एकास गावठी पिस्तूल विकले होते. त्यालाही पोलिसांनी बेड्या ठोकून त्याच्याकडून एक पिस्तूल आणि दोन जिवंत काडतूस हस्तगत केले.याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, परशुराम करवले आणि अक्षय जाधव असे अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. परशुराम हा डोंबिवली पूर्वेकडील पांडुरंगवाडी येथे गावठी पिस्तूल विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मानपाडा पोलिसांना मिळाली होती. या ठिकाणी पोलिसांनी सापळा रचून परशुरामला अटक केली. परशुराम व अक्षय हे दोन्ही सातारा येथील पोलीस रेकॉर्डवरील आरोपी असून त्यांच्याविरोधात कराड, वडुज, सातारा अवैध शस्त्र विक्री व वाळुचोरीचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

### दोन पिस्तूल, ४ जिवंत काडतूस हस्तगत

**१८ जुलै रोजी सोडत; अर्ज नोंदणी, ऑनलाइन अर्ज भरणा-स्वीकृतीला प्रारंभ**

# 'म्हाडा'च्या मुंबई मंडळातर्फे ४ हजार ८३ सदनिका विक्रीसाठी आजपासून नोंदणी

**मुंबई (प्रतिनिधी) :**

म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळातर्फे मुंबईतील विविध गृहप्रकल्पांतर्गत विविध उत्पन्न गटांसाठी ४०८३ सदनिकांच्या विक्रीसाठी सोडत जाहीर करण्यात आली आहे. या सोडतीचे अर्ज नोंदणी, ऑनलाइन अर्ज भरणा-स्वीकृतीला २२ मेपासून दुपारी ३ वाजेनंतर प्रारंभ होणार आहे. प्राप्त अर्जांची संगणकीय सोडत १८ जुलै रोजी सकाळी ११.०० वाजता वांद्रे पश्चिम येथील रंगशारदा नाट्यगृहात काढण्यात येणार आहे.

घरांच्या विक्रीकरिता उपलब्ध असलेल्या सर्व सदनिकांबाबत विस्तृत माहिती म्हाडाचे अधिकृत संकेत स्थळ https://housing.mhada.gov.in तसेच https://www.mhada.gov.in यांवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. इच्छुक अर्जदारांनी सहभाग घेण्याकरिता याच संकेत स्थळांचा वापर करावा, असे आवाहन मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर यांनी केले आहे. सोडत प्रक्रियेत सहभाग घेण्याकरिता सर्वप्रथम अर्जदारांनी ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक असून नोंदणी केलेल्या पात्र अर्जदारांना अर्ज सादर करण्याकरिता २६ जून रोजी सायंकाळी सहा वाजेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. अर्जासोबत आवश्यक असलेली उत्पन्न गट निहाय आवश्यक असलेली अनामत रक्कम क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, इंटरनेट बँकिंगद्वारे ऑनलाइन भरण्यासाठी २६ जून रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदत असणार आहे. तसेच अनामत रकमेचा भरणा बँकेत आरटीजीएस, एनईएफटीद्वारे करण्यासाठी २८ जून रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत करता येणार आहे. सोडतीसाठी प्राप्त अर्जांची प्रारूप यादी ४ जुलै रोजी दुपारी ३ वाजता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in व https://www.mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळांवर प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यापासून ऑनलाइन दावे व हरकती ७ जुलै दुपारी ३ वाजेपर्यंत दाखल करता येणार आहे. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांची अंतिम यादी १२ जुलै रोजी दुपारी ३ वाजता म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळांवर प्रसिद्ध केली जाणार आहे.

मुंबई मंडळाच्या सोडतीत एकूण ४०८३ सदनिकांचा समावेश आहे. यात अत्यल्प उत्पन्न गटासाठी २७९०, अल्प उत्पन्न गटासाठी १०३४, मध्यम उत्पन्न गटासाठी १३९ आणि उच्च उत्पन्न गटासाठी १२० सदनिका आहेत. सोडतीमधील अत्यल्प उत्पन्न गटात पहाडी गोरेगाव पश्चिम येथील प्रधानमंत्री आवास योजनेतील १९४७, अँन्टॉप हिलमधील ४१७, तर विक्रोळीच्या कन्नमवार नगरमधील ४२४ अशी एकूण २७८८ सदनिका समाविष्ट आहेत. अल्प उत्पन्न गटात एकूण १०३४ सदनिका असून गोरेगावमधील पहाडी परिसरातील ७३६ सदनिकांचा त्यात समावेश आहे.



**या गटांकरिता करता येणार अर्ज**

अत्यल्प उत्पन्न गटाकरिता (EWS) वार्षिक सहा लाख रुपयांपर्यंत उत्पन्न आवश्यक आहे. अल्प उत्पन्न गटाकरिता (LIG) वार्षिक नऊ लाख रुपयांपर्यंत उत्पन्न आवश्यक आहे. मध्यम उत्पन्न गटाकरिता (MIG) बारा लाख रुपयांपर्यंत उत्पन्न आवश्यक आहे. उच्च उत्पन्न गटाकरिता (HIG) कमाल उत्पन्न मर्यादा नाही. उपरोक्त चारही उत्पन्न गटासाठी किमान मर्यादा निश्चित करण्यात आलेली नसली तरी अत्यल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी अर्ज करू शकतात. अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती अल्प व मध्यम उत्पन्न गटासाठी अर्ज करू शकतात. मध्यम उत्पन्न गटातील व्यक्ती मध्यम व उच्च उत्पन्न गटासाठी अर्ज करू शकतात. उच्च उत्पन्न गटातील व्यक्ती केवळ उच्च उत्पन्न गटासाठीच अर्ज करू शकतात.

**एकूण सदनिका ४०८३**

- अत्यल्प – २७९०
- अल्प – १०३४
- मध्यम – १३९
- उच्च – १२०

# दिल्ली कोर्टाच्या परिसरात महिला आणि पुरुष वकिलांमध्ये जोरदार हाणामारी

**नवी दिल्ली :** दिल्लीतील रोहिणी कोर्टाच्या परिसरात दोन वकिलांमध्ये जोरदार भांडण झाले. त्यात एक महिला वकील आणि एक पुरुष वकील यांनी एकमेकांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. या दोन्ही वकिलांविरोधात पोलिसांनी तक्रार दाखल केली आहे. या घटनेबद्दल मिळालेल्या माहितीनुसार, महिला वकिलाने पुरुष वकिलाच्या विरोधात पोलीस उपायुक्तांकडे एक औपचारिक तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत महिला वकिलाने पुरुष वकिलावर अनेक गंभीर आरोप केले आहेत. पुरुष वकिलाचे नाव विष्णू कुमार शर्मा असून महिला वकिलाने विष्णू कुमार यांच्यावर छळ करणे, शारीरिक हिंसा आणि धमकावणे अशा प्रकारचे गंभीर आरोप केले आहेत.

# बँक मॅनेजरचा अपघातात मृत्यू

**सिल्लोड :** छत्रपती संभाजीनगरमधून एक मन सुन्न करणारी घटना उघडकीस आली आहे. दुचाकीच्या अपघातात एका मॅनेजरचा मृत्यू झाला आहे. ही भीषण घटना छत्रपती संभाजीनगरच्या सिल्लोड-भराडी रस्त्यावरील पाबळवाडी शिवारात घडली. नामदेव रायभान पवार असे मृताच्या व्यक्तीचे नाव आहे. ते सिल्लोड येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत मॅनेजर म्हणून कार्यरत होते.

## पापुआ न्यू गिनीच्या पंतप्रधानाकडून स्वागतात

# पंतप्रधान मोदींचे चरणस्पर्श

पंतप्रधान नरेंद्र मोदी त्यांच्या तीन देशांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यासाठी रविवारी पापुआ न्यू गिनीमध्ये पोहोचले. फिपिक परिषदेत सहभागी होण्यासाठी पं तप्रधान नरें द्र मोदी पापुआ न्यू गिनीमध्ये दाखल होताच त्यांचे पापुआ न्यू गिनीचे पंतप्रधान जेम्स मारापे यांनी पंतप्रधान मोदी यांचे चरणस्पर्श करून स्वागत केले. याची जगभर चर्चा आहे. विशेष म्हणजे या इं डो पॅसिफिक प्रदेशाला भारतीय पंतप्रधानांनी दिलेली ही पहिलीच भेट आहे.

पापुआ न्यू गिनी हे हिं द प्रशांत महासागरात स्थित एक बे ट आहे आणि त्याच्या स्थानामुळे हिंद पॅसिफिक महासागराच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा दौरा खूप महत्त्वाचा आहे. पापुआ न्यू गिनी सरकारने आपली परंपरा मोडत पंतप्रधान मोदींचे स्वागत केले. कारण या देशात असा नियम आहे की, सू र्यास्तानंतर तेथे आलेल्या कोणत्याही ने त्याचे औपचारिक स्वागत केले जात नाही. मात्र पंतप्रधान मोदींचे आगमन होताच त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. पापुआ न्यू गिनी येथील मोरेस्बी आंतरराष्ट्रीय विमानतळावर पंतप्रधान मोदींचे पारंपरिक पद्धतीने जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने अनिवासी भारतीयही उपस्थित होते. यावेळी पं तप्रधानांना गार्ड ऑफ ऑनरही देण्यात आला. पं तप्रधान नरें द्र मोदी उद्या २२ मे रोजी पापुआ न्यू गिनीच्या पंतप्रधानांसोबत भारत-पॅसिफिक द्वीपसमूह सहकार्यासाठी तिसऱ्या फिपिक शिखर परिषदेत सहभागी होतील. फिपिकची स्थापना २०१४ मध्ये पंतप्रधान मोदींच्या फिजी दौऱ्या दरम्यान झाली होती. नरें द्र मोदी यांच्या आधी कोणतेही भारतीय पंतप्रधान पापुआ न्यू गिनीला गे ले नव्हते. या दे शाला भे ट दे णारे मोदी हे पहिलेच भारतीय पंतप्रधान आहेत. पापुआ न्यू गिनीला जाण्यापूर्वी मोदी जपान दौऱ्यावर गेले होते. हिरोशिमा येथे आयोजित जी-७ शिखर परिषदेत ते सहभागी झाले होते. तेथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अने क जागतिक नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेतल्या. येथे ते फिपिक शिखर परिषदेत एकूण १४ देशांचे नेते सहभागी होणार आहेत.



पंतप्रधानांचा हा दौरा खूप महत्त्वाचा आहे. पं तप्रधानांनी त्यांना मिठी मारून शुभेच्छा स्वीकारल्या. येथे ते फिपिक शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

# मुबई विद्यापीठाच्या कुलगुरूच्या निवडीआधी वादाची किनार

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू नेमणुकीसाठी शोध समितीकडून पाच नावे राज्यपाल तथा कु लपती रमेश बैस यांच्याकडे सुपुर्द करण्यात आली असून मे महिन्याच्या अखेरीस नव्या कु लगुरूंची घोषणा करण्यात येणार आहे. मात्र त्याआधीच कुलगुरू पदाच्या उमे दवारासाठी निवडण्यात आलेल्या नावावरून नवीन वाद निर्माण झाला आहे.

मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू पदाच्या निवडीसाठी शोध समिति नेमण्यात आली होती. त्यानुसार समितीकडून पाच नावे निश्चित करण्यात आली असून ती नावे राज्यपालांकडे सोपविण्यात आली. या पाचही उमेदवारांची २६ मे रोजी अंतिम मु लाखत होणार असू न मे महिन्याच्या अखे रीस नवीन कु लगुरू मिळणार आहेत. समितीकडून निश्चित करण्यात आलेल्या पाच नावांपैकी माजी प्र-कु लगुरू रवींद्र कुलकर्णी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाचे प्रा. सुरेश गोसावी, शिवाजी विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख ज्योती जाधव, भाभा ऑटोमिक संशोधन कें द्रांच्या शास्त्रज्ञ अर्च ना शर्मा, बनारस हिं दू विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक तेज प्रताप सिंग ही पाच नावे अंतिम करण्यात आली असल्याचे समजते.

## स्टट बँक ऑफ इंडियान केले स्पष्ट

# दोन हजारांच्या नोटा बदलण्यासाठी आयडी नको

**नागरिकानी गोंधळून न जाण्याचे बँकांचे आवाहन**

दोन हजारांच्या नोटा बदलण्यासाठी कोणत्याही फॉर्मची किंवा कोणत्याही ओळख प्रमाणपत्राची आवश्यकता नसल्याचे एसबीआयने स्पष्ट केल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा वाटत आहे. एसबीआयकडून आपल्या सर्व मंडळांच्या मुख्य कार्यालयांना पाठवलेल्या पत्रात ही बाब नमू द केल्याने आता स्टेट बँकेसोबत इतर बँका दे खील या नियमाचे पालन करतील अशी माहिती मिळत आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने ३० सप्टेंबरनंतर २००० च्या नोटा चलनातून रद्द करण्याची घोषणा केली आहे. त्यानंतर नागरिकांमध्ये एकच गोंधळ उडाला आहे. नक्की कशा प्रकारे या नोटा बँकेत जमा करायच्या हा देखील संभ्रम नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे. तसेच या संदर्भातली नियमावली वेळोवेळी बँकांकडून दे खील जाहीर करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी गोंधळून न जाण्याचे आवाहन बँकांकडून करण्यात ये त आहे. तसेच दोव हजारांच्या नोटा बदलून देताना एक फॉर्म जारी करत माहिती भरून द्यावी लागणार अशा चर्चा रंगल्या होत्या मात्र या पत्रानंतर यावर आता स्पष्टीकरण मिळाले आहे.



### मंगळवारपासून बदलता येणार नोटा

भारतीय रिझर्व्ह बँकेने मोठा निर्णय घेतला. आरबीआयने बाजारातून २००० रुपयांच्या नोटा मागे घेण्याचा निर्णय घेतला असून ३० सप्टेंबर २०२३ पर्यंतच नोटा वापरता येणार असल्याचे आरबीआयने म्हटले आहे. २०१८-१९मध्येच २००० रुपयांच्या नोटांची छपाई थांबवण्यात आली होती. नागरिकांना २००० रुपयांच्या नोटा बदलून घेण्यासाठी चार महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे. त्यामुळे मंगळवारपासून दोन हजारांच्या नोटा नागरिकांना बँकेत जाऊन बदलता येणार आहेत. एकावेळी फक्त २ हजार रुपयांच्या नोटा २० हजार रुपयांपर्यंत बदलू शकता. यासाठी बँकांना विशेष खिडकी उघडावी लागणार आहे. त्यामुळे तयारीसाठी आरबीयकडून बँकांना विशेष अवधी देखील देण्यात आला आहे.

### आरबीआयने नागरिकांना उपलब्ध करून दिलेले पर्याय

- ज्यांच्याकडे २००० रुपयांच्या नोटा आहेत, ते नागरिक २००० रुपयांच्या नोटा बँक खात्यात जमा करू शकतात किंवा बँकेच्या शाखेत जाऊन इतर नोटांद्वारे बदलू शकतात.
- बँकांमध्ये २००० रुपयांच्या नोटा बदलून घेण्याबाबत कोणतेही निर्बंध नाहीत. बँकांना याबाबत स्वतंत्रपणे नियम जारी करण्यात येणार आहे.
- २३ मे २०२३ पासून २००० रुपयांच्या नोटा २० हजार रुपयांच्या मर्यादेपर्यंत बदलता येतील.
- ज्यांच्याकडे २००० रुपयांच्या नोटा आहेत ते ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत २००० रुपयांची नोट बदलू शकतात. आरबीआयने यासंदर्भात बँकांना स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.
- २३ मे २०२३ पासून, आरबीआयच्या १९ प्रादेशिक कार्यालयांमध्ये २० हजार रुपयांच्या मर्यादेपर्यंत, २००० रुपयांच्या नोटांची देवाण-घेवाण करता येईल.
- आरबीआयने बँकांना २००० रुपयांच्या नोटा तत्काळ जारी करू नयेत असे सांगितले आहे.
- आयबीआयने सर्वसामान्य लोकांना ३० सप्टेंबर २०२३ पर्यंत २००० रुपयांची नोट बदलून घेण्यासाठी किंवा बँकेत जमा करण्यासाठीची मुदत दिली आहे.

# बोगस मतदानाला आळा घालण्यासाठी निवडणूक आयोगाकडून चाचपणी सुरू

निवडणुकीदरम्यान अने कदा बोगस मतदान होत असल्याचे प्रकार समोर आले आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी आणि निपक्षपातीपणे मुक्त वातावरणात निवडणुका पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने महत्त्वाचे पाऊल उचलले असून सध्या त्याबाबत चाचपणी सुरु आहे. याची अंमलबजावणी यंदा होऊ घातलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीपासून होण्याची शक्यता आहे.




निवडणूक आयोग यासाठी तंत्रज्ञानाची मदत घे णार आहे. यात मतदानानंतर मतदाराच्या बोटावर पारंपरिक शाईऐवजी ले झरची खू ण करण्यात येईल. ही खूण अनेक दिवस तशीच राहील, ती हटवणे शक्य होणार नाही. त्यामुळे व्यक्ती पुन्हा मतदान करायला आल्यास पकडला जाईल.

त्याचबरोबर ईव्हीएम मशीनला एक कॅमेरा लावण्यात येईल, ज्यात मतदानादरम्यान मतदाराचा फोटो काढला जाईल. एखादा व्यक्ती पुन्हा मतदान करायला आल्यास हा कॅमेरा त्या व्यक्तीची ओळख पटवून त्याबद्दलचा अलर्ट अधिकार्यास पाठवेल.या दोन्ही गोष्टींचे सध्या परीक्षण सुरु आहे. लवकरच त्या लागू करण्यात ये तील आणि त्यामुळे बोगस मतदानाला आळा बसेल, असा विश्वास निवडणूक आयोगाला वाटतो.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्कः-9594418181 / 8424989898